# दवीपकल्पीय पठारी प्रदेश- मध्यवर्ती उच्चाभूमी

**प्र.२. थोडक्यात उतरे लिहा**

## ६.० प्रस्तावना

**१. द्वीपकल्प हा शब्द कुठल्या शब्दापासून तयार झाला आहे?**

**उत्तर:** द्वीपकल्प म्हणजेच 'Peninsula' हा शब्द 'Pene' आणि 'Insula' या दोन लॅटिन शब्दांपासून तयार झाला आहे. यातील 'Pene' या शब्दाचा अर्थ 'जवळजवळ' आणि 'Insula' या शब्दाचा अर्थ 'द्वीप' असा होतो.

**२. भारतीय द्वीपकल्पातील कुठले प्रदेश खनिजसंपन्न आहेत?**

**उत्तर:** भारतीय द्वीपकल्पातील अरवली पर्वत, छोटा नागपूरचे पठार आणि कर्नाटकचे पठार हे खनिजसंपन्न प्रदेश आहेत.

**३. द्वीपकल्पाच्या दोन भागांची नावे सांगा.**

**उत्तर:** मध्यवर्ती उच्चभूमी-नर्मदा नदीच्या उत्तरेला आणि दख्खनचे पठार-नर्मदा नदीच्या दक्षिणेला असे नर्मदा नदीमुळे द्वीपकल्पाचे दोन भाग पडतात.

## ६.१ प्राकृतिक रचना

**४. मध्यवर्ती उच्चभूमीच्या उपविभागांची नावे सांगा.**

**उत्तर:** अरवली पर्वतरांगा, पूर्व राजस्थानची उच्चभूमी, माळवा पठार, बुंदेलखंड, बाघेलखंड, छोटा नागपूरचे पठार आणि विंध्य पर्वतरांग हे मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशाचे उपविभाग आहेत.

**५. छोटा नागपूर पठार कशामुळे खनिजसंपन्न झाले आहे?**

**उत्तर:** गोंडवननिर्मित खडकातील उच्च प्रतीच्या कोळशामुळे छोटा नागपूरचे पठार खनिजसंपन्न झाले आहे.

## ६.२ हवामान

**६. अरवली रांगेच्या पूर्वेकडे कुठल्या प्रकारचे हवामान आढळते?**

**उत्तर:** अरवली रांगेच्या पूर्वेकडे मध्य प्रदेश आणि झारखंड राज्यात कोरड्या व दमट उपोष्णकटिबंधीय हवामान आढळते.

## ६.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणिजीवन

**७. भारतीय मध्यवर्ती उच्चभूमीत जंगलतोडीमुळे कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत?**

**उत्तर:** भारतीय मध्यवर्ती उच्चभूमीत जंगलतोडीमुळे पर्यावरणासंबंधी समस्या निर्माण झाल्या आहेत.

## ६.५ लोकसंख्या आणि वसाहती

**८. २०११ च्या जनगणनेनुसार उच्चभूमीतील लोकसंख्येची घनता किती आहे?**

**उत्तर:** २०११ च्या जनगणनेनुसार, मध्यवर्ती उच्चभूमीत लोकसंख्येची घनता २०० ते ५०० व्यक्ती प्रति चौकिमी आहे, तर छत्तीसगढ राज्यात ती १०० ते २०० व्यक्ती प्रति चौकिमी आहे.

**९. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीत क़ोणत्या प्रकारच्या ग्रामीण वसाहती आढळतात?**

**उत्तर:** भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीत प्रदेशाचा उंचसखलपणा, जमिनीची सुपीकता, पाणीपुरवठा आणि सामाजिक-आर्थिक विकास यांनुसार मिश्र प्रकारच्या ग्रामीण वसाहती आढळतात.

## ६.६ आर्थिक विकास

**१०. मध्यवर्ती उच्चभूमीत घेतल्या जाणाऱ्या दोन मुख्य नगदी पिकांची नावे सांगा.**

**उत्तर:** कापूस आणि सोयाबीन ही दोन मुख्य नगदी पिके मध्यवर्ती उच्चभूमीत घेतली जातात.

**११. मध्यवर्ती उच्चभूमीत शेतीचा विकास कुठल्या कारणांमुळे खुंटला आहे?**

**उत्तर:** खालील कारणांमुळे मध्यवर्ती उच्चभूमीत शेतीचा विकास खुंटला आहे:

i. जमिनीची नापीकता

ii. कमी उत्पादकता

iii. सिंचन सुविधांचा अभाव

iv. आधुनिक पद्धतींचा वापर न करणे

**१२. बुंदेलखंडातील कोणत्या जिल्ह्यात फॉस्फेट सापडते?**

**उत्तर:** बुंदेलखंडातील ललितपूर आणि छत्तरपूर या जिल्ह्यात फॉस्फेट सापडते.

**१३. दामोदर नदीच्या खोऱ्यातील कोळशाचे साठे असणाऱ्या प्रमुख क्षेत्रांची नावे सांगा.**

**उत्तर:** दामोदर नदीच्या खोऱ्यात झारिया, राणिगंज, रामगड आणि पूर्व व पश्चिम बोकारो या क्षेत्रांत कोळशाचे साठे सापडतात.

## ६.७ नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या

**१४. मध्यवर्ती द्वीपकल्पाच्या पठारावर मुख्य पर्यावरणीय समस्या कोणत्या बाबींशी संबंधित आहेत?**

**उत्तर:** मध्यवर्ती द्वीपकल्पाच्या पठारावर मुख्य पर्यावरणीय समस्या या वृक्षतोड, खाणकाम, वीजनिर्मिती, औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाहनांची वर्दळ आणि विकास प्रकल्प या बाबींशी संबंधित आहेत.

**१५. मध्यवर्ती द्वीपकल्पीय उच्चभूमी ही कशाची भांडारे आहेत?**

**उत्तर:** मध्यवर्ती द्वीपकल्पीय उच्चभूमी ही भारताच्या खनिजसंपत्तीची आणि इंधन स्रोतांची भांडारे आहेत.

## प्र.३. टिपा लिहा

### ६.१ प्राकृतिक रचना

**१. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीची प्राकृतिक रचना**

**उत्तर:** i. उत्तर भारतीय मैदानांच्या दक्षिण सीमेपासून ते नर्मदा नदीपर्यंतच्या प्रदेशाला मध्यवर्ती उच्चभूमी म्हणतात.

ii. यात प्रामुख्याने गंगा नदीच्या खोऱ्यातील काही भागांचा समावेश होतो.

iii. अरवली पर्वत, पूर्व राजस्थानची उच्चभूमी, माळवा पठार, बुंदेलखंड, बाघेलखंड, छोटा नागपूरचे पठार, विंध्य पर्वतरांग हे मध्यवर्ती उच्चभूमीचे उपविभाग आहेत.

iv. या प्राकृतिक विभागातील उत्तरेकडील नद्या नैऋत्येकडून ईशान्य दिशेकडे वाहतात, यावरून या भागाचा सर्वसाधारण उतार लक्षात येतो.

v. मध्यवर्ती उच्चभूमी पश्चिमेकडे रुंद आणि पूर्वेकडे अरुंद होत जाते.

vi. या भागातील लक्षणीय भूस्वरूपे म्हणजे अरवली पर्वतातील माऊंट अबू, चंबळच्या खोल घळ्या, नर्मदा नदीच्या दुतर्फा असलेल्या संगमरवरी अरुंद दऱ्या, कैमूरचा भित्तीकडा होय.

**२. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीतली पूर्व राजस्थानची उच्चभूमी**

**उत्तर:** i. अरवली पर्वतरांगांच्या पायथ्यापासून पूर्वेकडे राजस्थानची उच्चभूमी पसरलेली आहे.

ii. इतरत्र सपाट असलेल्या जमिनीवर अरुंद, कमी उंचीच्या टेकड्या नैऋत्य-ईशान्य अशा पसरल्या आहेत.

iii. या भागाची सरासरी उंची सुमारे ३०० मीटर असून काही टेकड्यांची उंची सुमारे ६०० मीटर आहे.

iv. बनास ही चंबळ नदीची उपनदी या भागातून वाहते.

v. हा प्रदेश अरवली डोंगररांगांपासून पूर्वेकडील मैदानापर्यंत पसरला आहे. तेथे चंबळ आणि सिंद नद्यांचे जलोत्सारण क्षेत्र आहे.

vi. या भागात, नद्यांच्या प्रवाहामुळे घळ्या निर्माण झाल्या आहेत. हा प्रदेश 'बिहड' म्हणून ओळखला जातो.

*३. माळवा पठार

उत्तर: i. माळवा पठार मध्यवर्ती पठाराच्या नैऋत्येला आहे.

ii. हे पठार पश्चिमेकडील अरवली रांगा आणि दक्षिणेकडील विंध्य रांग यांच्यामध्ये पसरले आहे.

iii. या पठाराची सरासरी उंची ५०० मीटर आहे.

iv. कमी उठाव आणि सलग भूप्रदेश ही याची वैशिष्ट्ये आहेत.

v. माळव्याच्या सपाट भूप्रदेशावर काही ठिकाणी कमी उंचीच्या टेकड्या आहेत.

vi. माळवा पठाराचा बहुतांश भाग मध्य प्रदेशात येतो.

vii. या प्रदेशातून मही नदी उगम पावते, ती पुढे गुजरातमध्ये जाते.

viii. चंबळ व बेटवा या नद्याही या पठारावर उगम पावतात व उत्तरेकडे वाहतात.

## ६.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणिजीवन

४. मध्यवर्ती उच्चभूमीतील नैसर्गिक वनस्पती आणि जंगले

उत्तर: i. माळवा पठारावरील नैसर्गिक वनस्पती म्हणजे उष्णकटिबंधीय शुष्क वने होत.

ii. यांमध्ये सागाची जंगले विखुरलेली आहेत, येथे मुख्यत: बाभूळ, पळस हे वृक्ष आढळतात.

iii. मध्यवर्ती उच्चभूमीत कोरडी, पानझडी वृक्षांची वने आढळतात.

iv. येथे अनेक नैसर्गिक वनस्पतींचे अधिवास आढळतात. त्यात प्रामुख्याने साल वृक्षांची वने आढळतात.

v. येथील वने शुष्क व आर्द्र प्रकारची आहेत. झाडांची उंची सुमारे २५ मीटरपर्यंत असते.

vi. काही भागात बांबूची वने व छोटी झुडुपे आढळतात.

**५. मध्यवर्ती उच्चभूमीतील वन्य जीवन**

**उत्तर:** i. मध्यवर्ती उच्चभूमीत वाघ, आशियाई हत्ती, चारशिंगी सांबर, काळवीट, चिंकारा आणि रानटी कुत्रा हे प्राणी आढळतात.

ii. तसेच, सारंग आणि धनेश हे पक्षी मुख्यत: आढळतात.

iii. येथील अर्ध्याहून अधिक वने गुरेचराईसाठी साफ केली आहेत, तसेच येथे खाणकामही मोठ्या प्रमाणावर चालते.

iv. नैसर्गिक वनांचे नुकसान झाल्याने प्राण्यांना वावरणे कठीण झाले आहे. हत्ती व वाघ या प्राण्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे.

v. म्हणून, पठाराचा काही भाग संरक्षित केला आहे.

## ६.५ लोकसंख्या आणि वसाहती

### ६. मध्यवर्ती उच्चभूमीतील लोकसंख्या

**उत्तर:** i. २०११ च्या जनगणनेनुसार मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील लोकसंख्येची घनता २०० ते ५०० व्यक्ती प्रति चौकिमी आहे, तर छत्तीसगढ राज्यात ती १०० ते २०० व्यक्ती प्रति चौकिमी आहे.

ii. या भागात अनेक जमाती आहेत, जसे भिल्ल आणि मिनास जमाती. यांची बोलीभाषा आणि सामाजिक जीवन हे इतर लोकसंख्येपेक्षा वेगळे आहे. हे विविध भाषा बोलतात आणि संस्कृती जोपासतात.

iii. राजस्थानच्या मारवाड प्रांतातील भटकी जमात 'गाडिया लोहार' हे लोहारकाम करतात.

iv. शेतीची कामे सुरू होण्यापूर्वी गाडिया लोहार या प्रदेशातील शेतीची अवजारे व उपकरणे दुरुस्त करून देतात व विक्रीही करतात.

v. इंदौर आणि उज्जैन या भागात मराठी समाज मोठ्या प्रमाणावर आहे.

## ६.६ आर्थिक विकास

### *७. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील सिंचनाचे प्रमुख स्रोत

**उत्तर:** i. भारताचा मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेश सिंचनासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

ii. बुंदेलखंड भागातील सिंचनाचे मुख्य स्रोत विहिरी असून त्यातील पाणी पावसावर अवलंबून असते.

iii. तलाव हा सिंचनाचा दुसरा मुख्य स्रोत आहे.

iv. हे तलाव जिल्ह्यात सर्वत्र पसरले असून ते पिण्याच्या पाण्याचे व सिंचनाचे प्रमुख स्रोत आहेत.

v. प्रदेशातील जलस्तर तसेच विहिरींमधील पाण्याची पातळी पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या तलावांमुळे कायम राखली जाते.

***८. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील उद्योगधंदे**

**उत्तर:** i. वस्त्रोद्योग हा माळवा प्रांतातील प्रमुख उद्योग आहे.

ii. इंदौर व उज्जैन येथे वस्त्रोद्योगाच्या मोठ्या वसाहती आहेत.

iii. आदिवासी लोकांसाठी हस्तकलेच्या वस्तू हे उपजीविकेचे साधन आहे.

iv. रतलामचे लाखकाम, इंदौर येथे तयार होणाऱ्या चिंध्यांच्या बाहुल्या तसेच इंदौर, उज्जैनमधील कागदी लगद्यांपासून बनणाऱ्या वस्तू सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

v. इंदौरला डिझेल इंजिन बनवण्याचा मोठा उद्योग आहे.

vi. इंदौरजवळील पितमपूर हे औद्योगिक शहर असून येथे गाड्या तयार करणाऱ्या उद्योगांचे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण झाले आहे.

vii. इंदौर हे शहर मध्य प्रदेशचे व्यापारी केंद्र असून वस्त्रोद्योग व शेतीवर आधारित उत्पादनांचे प्रमुख केंद्र आहे.

**९. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीतील वाहतूक**

**उत्तर:** i. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीतील अधिकांश भागात बस आणि रेल्वेमार्ग विस्तारलेले आहेत.

ii. जबलपूर, इंदौर आणि भोपाळ या शहरांमध्ये आंतरराज्य बसस्थानके असून रस्त्यांचे उत्तम जाळे आहे.

iii. रेल्वेचे जाळे संपूर्ण प्रदेशभर पसरले आहे.

iv. जबलपूर हे भारतीय रेल्वेच्या पश्चिम-मध्य रेल्वे विभागाचे मुख्यालय आहे.

## १०. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीतील पर्यटन

**उत्तर:** i. बुंदेलखंड आणि बाघेलखंड प्रदेश यांना समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

ii. बुंदेलखंडात अनेक किल्ले, राजवाडे आणि मंदिरे आहेत.

iii. प्राचीन संस्कृती आणि परंपरांसाठी मध्य प्रदेश प्रसिद्ध आहे.

iv. मध्य प्रदेश पुरातन स्मारके आणि सर्व धर्मांच्या (हिंदू, मुस्लीम, जैन, बौद्ध) तीर्थक्षेत्रांसाठी प्रसिद्ध आहे.

v. क्षिप्रा नदीकाठी वसलेले उज्जैन शहर कुंभ-मेळ्यासाठी प्रसिद्ध आहे.

vi. मध्य प्रदेशातील खजुराहो शिल्प मंदिरे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत.

## प्र.४. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा.

### ६.१ प्राकृतिक रचना

**१. अरवली पर्वताची रांग डमरूच्या आकाराची आहे.**

**उत्तर:** i. बनास नदीच्या जोरदार प्रवाहामुळे अरवली पर्वताच्या पूर्वेकडील उताराची आणि लुनी नदीमुळे पश्चिम उताराची धूप झाली आहे, त्यामुळे अरवली पर्वतरांग खूप मोठ्या प्रमाणात झिजली आहे.

ii. ही झीज पूर्वेकडील उतारावर जास्त प्रमाणात झाली आहे.

iii. त्यामुळे, अरवली पर्वतरांगेचा मधला भाग जास्त अरुंद झाला असून त्याचा आकार डमरूसारखा झाला आहे.

### ६.३ मृदा

***२. अतिपर्जन्य असलेल्या प्रदेशात जांभी मृदा आढळते.** [जुलै १५]

**उत्तर:** i. पावसाच्या पाण्यामुळे मातीच्या वरच्या थरातील घटकद्रव्ये निचरा होऊन निघून जातात.

ii. परिणामी, मातीमध्ये लोहांशाचे प्रमाण जास्त असते आणि त्यामुळे मातीचा रंग गडद लाल दिसतो.

iii. त्यामुळे, जांभी मृदा अतिपर्जन्य असलेल्या प्रदेशात आढळते.

***३. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशात मिश्र प्रकारच्या ग्रामीण वसाहती आढळतात.**

**उत्तर:** i. अरवली प्रांतातील डोंगराळ भागात वाड्या व वस्त्या मोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या आहेत. मेवाड, मारवाड, अल्वर जिल्ह्यांमध्ये लांब अरुंद दऱ्यांच्या तुटक डोंगरांमध्ये शेतीजवळच्या एकएकट्या वसाहती आढळतात.

ii. मोठ्या प्रमाणावर घळ्यांची मालिका असलेल्या बुंदेलखंडात मोठी दाटीवाटीने घरे असलेली गावे सुरक्षित ठिकाणी वसलेली आहेत.

iii. विदीर्ण भूमीच्या घळ्यांच्या प्रदेशात विखुरलेल्या वसाहती आहेत.

iv. सुपीक मृदा असल्यामुळे माळवा प्रांतात समूहरूपाने मोठ्या वसाहती स्थापन होण्यास मदत झाली आहे.

v. बाघेलखंड पठार आणि छत्तीसगढच्या मैदानी प्रदेशात बंदिस्त आणि समूह स्वरूपाच्या वसाहती सपाट व सुपीक प्रदेशामुळे विकसित झाल्या आहेत.

vi. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील ग्रामीण वसाहती या प्रदेशाचा उंचसखलपणा, जमिनीची सुपीकता, पाणीपुरवठा आणि सामाजिक-आर्थिक विकास यांवर अवलंबून आहेत. यांनुसार या प्रदेशात मिश्र प्रकारच्या ग्रामीण वसाहती आढळतात.

## ६.६ आर्थिक विकास

***४. छोटा नागपूर पठारावर खाणकाम मोठ्या प्रमाणावर विकसित झाले आहे.** **[मार्च १४, १६]**

**उत्तर:** i. छोटा नागपूर पठारावर खाणकाम मोठ्या प्रमाणावर विकसित झाले आहे, कारण खनिजसंपत्ती व इंधन स्रोतांचे येथे भांडार असून येथे सापडणारी खनिजे प्रामुख्याने अभ्रक, बॉक्साइट, तांबे, चुनखडक, लोहखनिज, कोळसा इ. आहेत.

ii. दामोदर नदीचे खोरे हे कोळशाच्या खाणीसाठी प्रसिद्ध असून देशातील उच्च प्रतीच्या कोळशाचे प्रमुख उत्पादन क्षेत्र म्हणून हा प्रदेश ओळखला जातो. येथील प्रमुख कोळसा क्षेत्रे झारिया, राणिगंज, पूर्व व पश्चिम बोकारो, रामगड इ. आहेत.

## ६.७ नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या

**५. मध्यवर्ती उच्चभूमीतील खाणकामाचा पर्यावरणावर विपरीत परिणाम झाला आहे.**

**उत्तर:** i. सुस्पष्ट खाणकाम धोरण नसल्याने खाणमालक पर्यावरणाचा ऱ्हास करत आहेत.

ii. खाण बंद करण्यापूर्वी किंवा दुसरीकडे जाण्यापूर्वी जमीन पुन्हा पूर्वीसारखी सपाट किंवा नवीन वृक्षांची लागवड करण्याला खाणमालक बांधील नाहीत.

iii. खाणींजवळ राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर खनिजांचे कण, धूळ, स्फोट, खाणीतील आगी इत्यादींचे दुष्परिणाम होतात.

iv. या सर्व कारणांमुळे खाणकाम हे मध्यवर्ती उच्चभूमीवरील पर्यावरणावर विपरीत परिणाम करत आहे. तसेच तेथील रहिवाशांच्या आरोग्यावरही याचे दुष्परिणाम होत आहेत.

***६. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशात अनेक पर्यावरणीय समस्या आहेत.**

**उत्तर:** मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील अनेक पर्यावरणविषयक समस्या पुढीलप्रमाणे आहेत:

i. औद्योगिकीकरण, वीजनिर्मिती, शहरीकरण, वाहनांची वर्दळ इ.

ii. या प्रदेशातील वनांची संख्या बेसुमार वृक्षतोडीमुळे घटत आहे. विकास प्रकल्प, खाणकाम, शेतीविस्तार आणि वाहतुकीचा विकास यांमुळे हजारो हेक्टर वने नष्ट झाली आहेत.

iii. सुस्पष्ट खाणकाम धोरणाच्या अभावामुळे खाणमालक पर्यावरणाचा ऱ्हास करत आहेत.

iv. खनिजांचे कण, धूळ, स्फोट, खाणीतील आगी यांचा खाणीजवळ राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे.

v. विद्युत प्रकल्पातून निघालेले टाकाऊ पदार्थ आजूबाजूचे जलस्रोत व जलसाठे प्रदूषित करतात.

## प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

### ६.० प्रस्तावना

**१. 'भारतीय द्वीपकल्या' ची सविस्तर माहिती लिहा.**

**उत्तर:** i. उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाच्या दक्षिणेकडे असलेला भूभाग म्हणजे 'भारतीय द्वीपकल्प' होय.

ii. हा पृथ्वीवरील सर्वांत प्राचीन भूभागांपैकी एक आहे. प्राचीन काळापासून यात अनेक बदल घडत गेले.

iii. भारतीय द्वीपकल्पाचा अधिकांश भाग अग्निजन्य आणि रूपांतरित खडकांनी बनलेला आहे.

iv. या प्रदेशाने भारतीय भौगोलिक क्षेत्राच्या ३८% भाग व्यापलेला आहे. भारतीय द्वीपकल्प हे विविध खनिजांचे भांडार आहे.

v. भारतीय द्वीपकल्पाचे अरवली पर्वत, छोटा नागपूरचे पठार आणि कर्नाटकचे पठार हे खनिजसंपन्न प्रदेश आहेत.


vi. द्वीपकल्प ही पठारांची एक मालिक असून प्रत्येक पठाराला वेगळी प्राकृतिक वैशिष्ट्ये आहेत.

vii. पश्चिम घाट हा या द्वीपकल्पीय पठारावरील मुख्य जल विभाजक आहे.

viii. नर्मदा नदीमुळे द्वीपकल्पीय प्रदेशाचे दोन भाग पडतात:

अ. मध्यवर्ती उच्चभूमी: नर्मदा नदीच्या उत्तरेला

ब. दख्खनचे पठार: नर्मदा नदीच्या दक्षिणेला



*२. **मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशाचे विभाग सविस्तरपणे स्पष्ट करा.** [मार्च १४]

**उत्तर:** i. उत्तर भारतीय मैदानांच्या दक्षिण सीमेपासून ते नर्मदा नदीपर्यंतच्या प्रदेशाला मध्यवर्ती उच्चभूमी म्हणतात.

ii. अरवली पर्वतरांगा, पूर्व राजस्थानची उच्चभूमी, माळवा पठार, बुंदेलखंड, बाघेलखंड, छोटा नागपूरचे पठार आणि विंध्य पर्वतरांग हे उपविभाग आहेत.

**अ. अरवली पर्वत:**

ही पर्वतांची मालिका असून ती नैऋत्य-ईशान्य दिशेत पसरली आहे.

नैऋत्येला ती अधिक रुंद असून ईशान्येकडे अरुंद होत जाते. अरवलीमधील मुख्य भाग हा माऊंट अबू आणि अजमेर यांमधील डोंगर रूपात आहे.

अरवली पर्वतरांगेचा मधला भाग अरुंद झाला असून त्याला डमरूचा आकार प्राप्त झाला आहे.

**ब. पूर्व राजस्थानची उच्चभूमी:**

अरवली पर्वतरांगांच्या पायथ्यापासून पूर्वेकडे राजस्थानच्या उच्चभूमीचा विस्तार आहे.

सपाट जमिनीवर अरुंद कमी उंचीच्या टेकड्या नैऋत्य-ईशान्य पसरल्या आहेत.

या प्रदेशात बनास नदी वाहते जी चंबळ नदीची उपनदी आहे.

चंबळ व सिंद नद्यांच्या प्रवाहाला लागून असलेल्या भूभागाचे वैशिष्ट्य म्हणजे या नद्यांच्या प्रवाहामुळे निर्माण झालेल्या खोल घळ्या होय, त्यांना 'बिहड' असे म्हणतात

**क. बुंदेलखंड:**

माळवा पठाराच्या ईशान्येला असलेल्या प्रदेशाला बुंदेलखंड म्हणतात.

हा मध्य प्रदेशाचा उत्तर भाग आणि त्याला लागून असलेला उत्तर प्रदेशाचा दक्षिण भाग यांदरम्यान पसरलेला आहे. विखुरलेल्या टेकड्या असलेला सपाट भूप्रदेश असे या भागाच्या भूस्वरूपाचे वर्णन करता येईल.

यमुना नदीच्या खोऱ्याचा एक भाग बुंदेलखंडाने व्यापला आहे.

ड. **माळवा पठार:**

मध्यवर्तीय पठाराचा नैऋत्य भाग माळवा पठाराने व्यापला आहे.

कमी उठाव आणि सलग भूप्रदेश ही याची वैशिष्ट्ये आहेत.

हे पठार पश्चिमेला अरवली रांग आणि दक्षिणेला विंध्य रांग यांच्यामध्ये येते.

यातून मही नदी उगम पावते आणि पुढे गुजरात राज्यात जाते, तसेच चंबळ व बेटवा नद्या उगम पावून उत्तरेकडे वाहतात.

इ. **विंध्याचल-बाघेलखंड:**

विंध्याचल-बाघेलखंड हा प्रदेश बुंदेलखंडाच्या आग्नेयेला आणि माळवा पठाराच्या पूर्वेला आहे.

हा टोन्स व शोण आणि त्यांच्या उपनद्यांचा प्रदेश आहे.

याची नैऋत्य-ईशान्य दिशेत कड्यांची एक साखळी तयार झाली आहे.

याचा पूर्वेकडील विस्तार उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागापर्यंत आहे.

विंध्याचलाच्या पूर्वेला बाघेलखंड आहे, तो मध्य प्रदेश राज्याच्या पूर्व भागात व छत्तीसगढ राज्याच्या उत्तर भागात पसरला आहे.

नर्मदा नदी ही मध्यवर्ती उच्चभूमी आणि दखनचे पठार यांमधील प्राकृतिक सीमारेषा आहे.

**फ. छोटा नागपूरचे पठार:**

या पठाराचा बराच मोठा भाग झारखंड राज्यात असून त्याचा विस्तार शेजारील प. बंगाल, छत्तीसगढ, ओडिशा राज्यांतही झालेला आहे. छोटा नागपूर पठाराच्या मध्यवर्ती भागात पट्टीताश्म खडक सापडतात.

गोंडवननिर्मित खडकातील उच्च प्रतीच्या कोळशामुळे छोटा नागपूरचा प्रदेश खनिजसंपन्न झाला आहे.


या पठारांचा पृष्ठभाग सपाट असून कमी उंचीच्या गोलाकार घुमटासारख्या टेकड्यांनी तो सजलेला आहे.

**ग. विंध्य रांग:**

विंध्य रांग ही उत्तर-दक्षिण भारतामधील प्रत्यक्ष सीमारेषा म्हणून ओळखली जाते.

तिचा विस्तार गुजरातच्या पूर्व भागापासून ते बिहारपर्यंत जवळजवळ ११०० किमी आहे.

या रांगेत फारशी शिखरे नाहीत. विंध्य रांगेचे उत्तरेकडील उतार अगदी सौम्य आहेत आणि ते उत्तरेकडे दूरवर पसरलेले आहेत.


भारत
उ.
पूर्व राजस्थानची उच्चभूमी
मध्यवर्ती उच्चभूमी
अरवली पर्वत
माळवा पठार
नर्मदा नदी
विंध्य रांग
छोटा नागपूर
सातपुडा पर्वत
दख्खनचे पठार
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
अंदमान व निकोबार बेटे
लक्षद्वीप बेटे
हिंदी महासागर

**३. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीतील अरवली पर्वतरांगांविषयी माहिती लिहा.**

**उत्तर:** i. पर्वतांची मालिका असल्याप्रमाणे दिसणारी अरवली ही भारतातील अतिप्राचीन पर्वतरांग समजली जाते.

ii. ही नैऋत्य-ईशान्य दिशेस पसरली आहे.

iii. नैऋत्येला तिची रुंदी अधिक असून ईशान्येकडे कमी होत जाते.

iv. अरवलीमधील मुख्य भाग हा माऊंट अबू आणि अजमेर यांच्यामधील डोंगर रूपात आहे.

v. या डोंगररांगांमधील 'गुरूशिखर' हे सर्वांत उंच (१७२२ मीटर) शिखर आहे.

vi. ईशान्येकडे या डोंगरांची उंची कमी होत जाते आणि पुढे ती तुटक डोंगरांप्रमाणे दिसू लागते.

vii. बनास नदीच्या जोरदार प्रवाहामुळे अरवली पर्वतरांगेच्या पूर्वेकडील उताराची आणि लुनी नदीमुळे पश्चिम उताराची धूप झाली आहे.

viii. पूर्व उतारावरील जास्त धूप होण्यामुळे अरवली रांगेचा मध्य भाग जास्त अरुंद झाला असून त्याचा आकार डमरूसारखा झाला आहे.

ix. अरवली पर्वत हा या विभागातील जलविभाजक आहे.


भारत
उ.
अरवली पर्वत
मध्यवर्ती
उच्चभूमी
दख्खनचे पठार
अ
र
बी
स
मु
द्र
बंगालचा
उपसागर
अंदमान व
निकोबार बेटे
लक्षद्वीप
बेटे
हिंदी
महासागर

**४. भारताच्या मध्यवर्ती उच्चभूमीतील बुंदेलखंड प्रांताची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. माळवा पठाराच्या ईशान्येला असलेल्या प्रदेशाला बुंदेलखंड म्हणतात.

ii. हा मध्य प्रदेशच्या उत्तर भागात आणि त्याला लागून असलेल्या उत्तर प्रदेशचा दक्षिण भाग यांदरम्यान पसरला आहे.


iii. येथे प्रामुख्याने कणाश्म खडक आढळतो.

iv. बुंदेलखंडाचा उत्तर भाग लक्षणीयरीत्या सपाट असून, तो उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात सहज मिसळला आहे.

v. सपाट भूभाग तीव्र उताराच्या पठारांनी विभागला गेला आहे.

vi. विखुरलेल्या टेकड्या असलेला सपाट भूप्रदेश असे बुंदेलखंडाच्या एकूण भूस्वरूपाचे वर्णन करता येईल.

vii. यमुना नदीच्या खोऱ्याचा एक भाग बुंदेलखंडाने व्यापला आहे.




**५. मध्यवर्ती उच्चभूमीतील विंध्याचल-बाघेलखंड प्रदेशाची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. बुंदेलखंडाच्या आग्नेयेला आणि माळवा पठाराच्या पूर्वेकडील प्रदेश म्हणजे विंध्याचल-बाघेलखंड प्रदेश होय.

ii. हा टोन्स, शोण आणि त्यांच्या उपनद्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो.

iii. विंध्याचल पर्वताची नैऋत्य-ईशान्य दिशेत कड्यांची एक रांग तयार झाली आहे.

iv. हे कडे तीव्र उताराचे असून उत्तरेकडे तुटकपणे विखुरलेले आहेत, तर दक्षिणेकडे सलग असून त्यांची भिंतच तयार झाली आहे.


v. विंध्याचलाचा बहुतांश भाग मध्य प्रदेश राज्यात येतो.

vi. त्याचा पूर्वेकडील विस्तार उत्तर प्रदेश राज्याच्या पूर्व भागापर्यंत आहे.

vii. विंध्याचलाच्या पूर्वेकडे बाघेलखंड प्रदेश आहे, तो मध्य प्रदेशच्या पूर्व भागात आणि छत्तीसगढच्या उत्तर भागात पसरला आहे.

viii. नर्मदा नदी ही मध्यवर्ती उच्चभूमी आणि दख्खनचे पठार यांमधील प्राकृतिक सीमारेषा मानली जाते.

ix. बाघेलखंडातून शोण नदीच्या बहुतेक उपनद्या उगम पावतात.


भारत
उ.
मध्यवर्ती
उच्चभूमी
अरवली पर्वत
माळवा पठार
नर्मदा नदी
विंध्य रांग
अ
र
बी
स
मु
द्र
दख्खनचे पठार
बंगालचा
उपसागर
अंदमान व
निकोबार बेटे
लक्षद्वीप
बेटे
हिंदी
महासागर

**६. मध्यवर्ती उच्चभूमीतील विंध्य रांगेची प्राकृतिक रचना स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. विंध्य रांग ही उत्तर आणि दक्षिण भारताची प्रत्यक्ष सीमारेषा म्हणून ओळखली जाते.


ii. तिचा विस्तार गुजरातच्या पूर्व भागापासून ते बिहारपर्यंत सुमारे ११०० किमी आहे.

iii. विंध्य रांगेची सरासरी उंची सुमारे ४५० ते ६०० मीटर असून काही ठिकाणी ९०० मीटरपेक्षा जास्त आहे.

iv. या रांगेत फारशी शिखरे नाहीत.

v. या रांगेची दक्षिण सीमा नर्मदा नदी आहे.

vi. विंध्य रांगेचे उत्तरेकडील उतार अगदी सौम्य आहेत आणि ते उत्तरेकडे बऱ्याच लांब अंतरावर पसरलेले आहेत.




## ६.२ हवामान

**७. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील हवामान स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेश विस्ताराने मोठा असल्याने येथील हवामानात विविधता आढळते.

ii. जून ते सप्टेंबर दरम्यान पावसाळा असून वार्षिक पर्जन्यमान ७५० ते १५०० मिमी असते.

iii. अरवली रांगेच्या पूर्वेकडे मध्य प्रदेश व झारखंड राज्यात कोरड्या व दमट उपोष्णकटिबंधीय हवामानाचा अनुभव येतो.

iv. उन्हाळा कडक असतो आणि हिवाळा कोरडा असतो.

v. उन्हाळ्यात सखल प्रदेशात तापमान ४६° सें. पर्यंत जाऊ शकते.

vi. मे आणि जून सर्वाधिक तापमानाचे महिने आहेत.



***८. मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील शेतीची वैशिष्ट्ये कोणती? [मार्च १५]**

**किंवा**

**भारताच्या पठारी मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील शेतीची वैशिष्ट्ये कोणती? [जुलै १६]**

**उत्तर:** i. भारताच्या मध्यवर्तीय उच्चभूमी प्रदेशात शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे.

ii. कापूस आणि सोयाबीन ही मुख्य नगदी पिके येथे घेतली जातात.

iii. तसेच गहू, तांदूळ, ज्वारी, मका, बाजरी, हरभरा, मूग, उडीद इ. प्रमुख पिके आहेत.

iv. हा पठारी प्रदेश सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहे, तर शेतीसाठी पाण्याचा दुसरा मुख्य स्रोत तलाव आहे.

v. जमिनीची नापीकता, कमी उत्पादकता, सिंचन सुविधांचा अभाव आणि आधुनिक पद्धतींचा वापर न करणे या बाबींमुळे या प्रदेशातील शेतीचा विकास खुंटला आहे.

[प्र. ५ मधील (७) चा नकाशा पाहावा.]

## प्र.६. नकाशा वाचन

**भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक ५१ वरील आकृती ६.१ चे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. हा नकाशा कशाचा आहे?**

**उत्तर:** हा नकाशा मध्यवर्ती उच्चभूमीची प्राकृतिक रचना दर्शविणारा आहे.

**२. मध्यवर्ती उच्चभूमीच्या पश्चिम भागातील पर्वताचे नाव सांगा.**

**उत्तर:** अरवली पर्वत हा मध्यवर्ती उच्चभूमीच्या पश्चिम भागात वसलेला आहे.

**३. मध्यवर्ती उच्चभूमीच्या दक्षिणेला कोणत्या पर्वतरांगा आढळतात?**

**उत्तर:** मध्यवर्ती उच्चभूमीच्या दक्षिणेला विंध्य, महादेव आणि मैकल या पर्वतरांगा आढळतात.

**४. मध्यवर्ती उच्चभूमीच्या ईशान्य भागात कोणत्या टेकड्या आहेत?**

**उत्तर:** मध्यवर्ती उच्चभूमीच्या ईशान्य दिशेला राजमहल टेकड्या आहेत.

**५. विंध्य रांगेच्या दक्षिणेला कोणती नदी वाहते?**

**उत्तर:** विंध्य रांगेच्या दक्षिणेला तापी नदी वांहते.

**६. बेटवा आणि केन या नद्यांचा उतार कोणत्या दिशेला आहे?**

**उत्तर:** बेटवा आणि केन या नद्यांचा उतार उत्तर दिशेला आहे.

**७. मध्यवर्ती उच्चभूमीच्या मध्य भागात कोणते पठार आहे?**

**उत्तर:** मध्यवर्ती उच्चभूमीच्या मध्य भागात बुंदेलखंड पठार आहे.